दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक २९८ वा मंगळवार दि.२७ मे २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.




# दहशतवादाविरूध्द आमचे शून्य सहनशीलतेचे धोरण ; नरेंद्र मोदींनी पुन्हा दिला इशारा

भुज : भारतीयांचे रक्त सांडणाऱ्यांना त्यांच्याच भाषेत उत्तर दिले जाईल. मी सैन्याला मोकळीक दिली आहे. भारतीयांवर नजर ठेवणाऱ्यांना सोडले जाणार नाही असा इशारा पुन्हा एकदा पाकिस्तानचे नाव न घेता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला आहे. पंतप्रधान आज गुजरातमधील भुज जिल्ह्यातील एका कार्यक्रमात पोहोचले. येथे त्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले. यावेळी त्यांनी अनेक क्षेत्रांसाठी ५३,४०० कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन केले. यादरम्यान त्यांनी एका जाहीर सभेलाही संबोधित केले.

पाकिस्तानला कडक इशारा देताना मोदी म्हणाले की, शांततेने जीवन जगा, भाकरी खा, अन्यथा गोळी आहेच. पाकिस्तानच्या लोकांना त्यांच्या देशाला दहशतवादापासून मुक्त करण्यासाठी पुढे यावे लागेल. त्यांच्या तरुणांना पुढे यावे लागेल. दहशतवादाविरुद्ध आमचे धोरण शून्य सहनशीलतेचे आहे. ऑपरेशन सिंदूरने आमचे धोरण अगदी स्पष्ट केले आहे. जो कोणी आमचे रक्त सांडेल त्याला असेच उत्तर मिळेल. त्यांना कोणत्याही किंमतीत सोडले जाणार नाही. ऑपरेशन सिंदूर हे मानवतेला वाचवण्याचे आणि दहशतवाद संपवण्याचे एक अभियान आहे. पाकिस्तान दहशतवादाविरुद्ध काही कारवाई करेल का हे पाहण्यासाठी आम्ही १५ दिवस वाट पाहिली, परंतु कदाचित दहशतवाद हा त्यांचा जीव आहे. जेव्हा त्यांनी काहीही केले नाही, तेव्हा मी माझ्या सशस्त्र दलांना मोकळीक दिली.



पंतप्रधान म्हणाले, भारताच्या प्रत्युत्तरानंतर पाकिस्तान घाबरला आहे. त्यांनी कच्छसह सीमावर्ती भागात ड्रोन पाठवले. १९७१ च्या युद्धादरम्यान, कच्छच्या शूर महिलांनी ७२ तासांत भुज धावपट्टी दुरुस्त करून पाकिस्तानच्या प्रचाराला पराभूत केले. त्या महिला माझ्याकडे आल्या आणि मला आशीर्वाद दिला. यासोबतच त्यांनी मला सिंदूरचा रोपही भेट दिला. तो पंतप्रधानांच्या निवासस्थानी लावला जाईल.

पंतप्रधान मोदी म्हणाले,कच्छशी माझे नाते जुने आहे. कच्छमधील लोक आणि त्यांच्या आत्मविश्वासाने मला नेहमीच मार्गदर्शन केले आहे. जेव्हा नर्मदेचे पाणी पहिल्यांदा कच्छमध्ये पोहोचले तेव्हा तो दिवस कच्छसाठी दिवाळीपेक्षा कमी नव्हता. तो एक अभूतपूर्व उत्सव होता. सुदैवाने, तुम्ही सर्वांनी मला हे घडण्याचे कारण बनण्याची संधी दिली.

## स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या तोंडावर अक्षय धावारे यांची दुसऱ्यांदा मराठवाडा निरीक्षक पदी निवड



लातूर :– गेल्या पंधरा वर्षांपासून आंबेडकरी चळवळीत सक्रिय काम करणारा युवक अक्षय धावारे यांची दुसऱ्यांदा मराठवाडा निरीक्षक पदी निवड करण्यात आली आहे भिम आर्मी चे संस्थापक तथा आजाद समाज पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार चंद्रशेखर आजाद, भिम आर्मी चे राष्ट्रीय अध्यक्ष विनयरतन सिंह यांच्या आदेशाने महाराष्ट्राचे प्रभारी अनिल धेनवाल राष्ट्रीय महासचिव अशोक कांबळे यांनी ही निवड केली आहे शोषित पिडीत वंचित घटकांचा आवाज म्हणून ओळख असलेला समाजावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध लढा देणारा समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी झटणाऱ्या अक्षय धावारे यांचा आक्रमक चेहरा म्हणून सर्वत्र ओळख आहे समाजासाठी दिवस रात्र संघर्ष करताना अनेक संकटांचा सामना करावा लागतो वेगवेगळ्या पोलीस स्टेशनमध्ये वेगवेगळे गुन्हे दाखल आहेत ३५३ सारखे अनेक गंभीर गुन्हे दाखल असताना पिडीतांना न्याय मिळवून देण्यासाठी सामाजिक कार्यासाठी सदैव पुढे असतो योग्य व्यक्तीची योग्य ठिकाणी निवड करून त्याचा सन्मान केला त्यामुळे समाजातून मित्र परिवारातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या तोंडावर ही निवड झाली आहे मराठवाड्यात अक्षय धावारे यांची भुमिका काय असणार यांकडे सर्वांचे लक्ष लागले आहे




## पंच हा शब्द तथागत बुद्धांच्या शाक्यकुळाशी जोडला जातो - लक्ष्मण भगत

मुंबई :– विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महाड चवदार तळ्याच्या सत्याग्रहाच्या जाहीर सभेत असे म्हणाले की मी 'पंचाचे लेकरू आहे' तसेच महात्मा फुलेंनी आपल्या ब्राम्हणांचे कसब या ग्रंथामध्ये असे म्हणतात की 'अस्पृश्य समाजाने ब्राह्मणांकडून विधी न करून घेता आपल्या पंचांकडून करून घ्यावी' याचाच अर्थ असा आहे की महात्मा फुले ही तथागत गौतम बुद्धांच्या शाक्यकुळाच्या विचारांचे पाईक होते व पुढे तोच वारसा बाबासाहेबांनी ही चालवला यातूनच महार न्याती पंचायत समितीचा उगम झाला व पुढे त्याचे नामांतर बौद्धजन पंचायत समिती मध्ये झाले असेल, आपल्या कोकनवासीय बांधवांचा सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक पातळीवर विकास व्हावा त्यांची प्रगती व्हावी या उद्देशाने बाबासाहेबांनी महार न्याती समितीची स्थापना केली व त्यासंदर्भात अनेक ठिकाणी सभा घेऊन मार्गदर्शन केले कार्यकर्त्यांना आदेश देऊन उद्देश व उद्दिष्टे यांचा प्रचार व प्रसार केला, २५ मे १९४१ ला गणपत कासारे (लाटवणकर) यांच्या अंगणात महार परिषद भरली त्यावेळी बाबासाहेबांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करून उद्दिष्टे निर्माण करण्याची सूचना केली व वेगवेगळ्या राहुट्यात न राहता सर्वांनी एकत्र येऊन कामकाजाला लागा असा आदेश दिला त्यामुळेच बाबासाहेबांनी जो विज्ञानवादि दृष्टीकोन दिला तोच समाजाने आत्मसात केला म्हणूनच बौद्धजन पंचायत समितीच्या माध्यमातून कोकणप्रांतांचा विकास झाला अनेक कार्यकर्ते याच मुशीत घडून त्यांनीही पुढे यशस्वी घोडदौड सुरू ठेवली या झंझावाती आजही महाराष्ट्र भारावला आहे अश्या झंझावाती विचारधारेच्या बौद्धजन पंचायत समितीला आज ८४ वर्षे पूर्ण होऊन ८५ व्या वर्षात पदार्पण करत आहे हा वर्धापन दिन साजरा करत आहे, महार न्याती समिती अर्थात बौद्धजन पंचायत समितीची



निर्मिती, त्यामागील ध्येय व उद्दिष्टे, कार्यपद्धती ही लोकशाही मार्गाने चालणारी आहे, अनेक संस्था असतील परंतु बौद्धजन पंचायत समिती ही लोकशाही घटनेप्रमाणे कामकाज करणारी महाराष्ट्रातील एकमेव संघटना आहे व गेली ८४ वर्षे एकसंघ राहून ती विस्तारित होत फोफावत आहे, या संघटनेची धुरा बाबासाहेबांनंतर सुर्यपूत्र भैय्यासाहेब आंबेडकर पुढे तेवत ठेवून त्यांनी बाबासाहेबांचे पहिले स्मारक उभे करून आज त्याचे रूपांतर सात मजली इमारतीत बाबासाहेबांचे नातू व बौद्धजन पंचायत समितीचे सभापती आनंदराज आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहे ज्यात महिलांना उद्योजक होण्यासाठी एक मजला राखीव ठेवला आहे सोबतच अनेक योजना या इमारतीद्वारे राबविण्यात येणार आहेत त्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन आनंदराज आंबेडकरांचे हात बळकट करावे असे आवाहन करीत पंच हा शब्द तथागत गौतम बुद्धांच्या शाक्यकुळाशी जोडला जातो असे प्रतिपादन लक्ष्मण भगत यांनी अध्यक्षीय भाषण बोलत असता केले. बौद्धजन पंचायत समितीचा ८४ वा वर्धापन दिन कार्याध्यक्ष लक्ष्मण भगत यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृह, परेल, मुंबई – १२ येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. सदर कार्यक्रमाचे धार्मिक विधी व सूत्रसंचालन संस्कार समितीचे अध्यक्ष मंगेश पवार यांनी आपल्या गोड वाणीने व लाघवी भाषाशैलीत सादर केले. सदर प्रसंगी सरचिटणीस राजेश घाडगे, उपकार्याध्यक्ष एच. आर. पवार यांनी ही आपले मौलिक विचार मांडून मार्गदर्शन केले त्यासोबतच महिला मंडळाच्या उपाध्यक्षा प्रमिलाताई मर्चंडे, मनोहर बा. मोरे, अरुण मोरे, श्रीधर जाधव, अनिरुद्ध जाधव, गजानन तांबे यांनीही आपले विचार व्यक्त केले, सदर कार्यक्रमास शिवडी गटक्रमांक १३ चे गटप्रमुख राजाभाऊ तथा रामदास धो. गमरे, महेंद्र पवार, आर्थिक समितीचे अध्यक्ष अरुण मोरे, सुभाष जाधव, रत्नागिरी तालुका बौद्धजन पंचायत समितीचे चिटणीस सुहास कांबळे, उदय कांबळे, सुशीलाताई जाधव आदी मान्यवर व असे अनेक कार्यकर्ते, विश्वस्त, बौद्धाचार्य, महिला मंडळ भरपावसात पावसाची तमा न बाळगता मोठ्या संख्येने उपस्थित होते, सरतेशेवटी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अथक परिश्रम घेणाऱ्या सर्वांचे व उपस्थितांचे आभार मानून संस्कार समितीचे अध्यक्ष मंगेश पवार यांनी कार्यक्रमाची सांगता केली.

## लोकनेते विलासराव देशमुख यांच्या ८० व्या जयंती निमित्त अंध बंधू -भगिनींसाठी पांढरी स्टिक वाटप



लातूर :– लोकनेते विलासराव देशमुख यांच्या ८० व्या जयंती निमित्त अंध बंधू –भगिनींसाठी पांढरी स्टिक वाटप. मनोधैर्य सेवाभावी संस्था, लातूर च्या वतीने पवनकुमार गायकवाड यांच्या पुढाकारातून शासकीय अंध मुलांची शाळा येथे अंध बंधू –भगिनी साठी आधार देणारी पांढरी स्टिक मान्यवराच्या हस्ते वाटप करण्यात आली यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी उपमहापौर, कैलासजी कांबळे, लातूर शहर अल्पसंख्यांक काँग्रेस चे शहर जिल्हा अध्यक्ष ॲड. फारुख शेख, लातूर शहर जिल्हा युवक काँग्रेस चे शहर जिल्हा अध्यक्ष, सय्यद इम्रान, लातूर शहर जिल्हा काँग्रेस अनुसूचित जाती विभागाचे शहर अध्यक्ष, प्रा. प्रवीण कांबळे,शासकीय अंध मुलांच्या शाळेचे निरीक्षक. अमोल निलंगेकर,श्रीमती. कमलबाई मिटकरी,असलम भाई शेख,शहाबाज खान,खाजाभाई शेख,ॲड. गणेश कांबळे,युसूफ सय्यद, शेख फारुख, शेख पाशा,रोहित काळे,वडुरले रोहित, शेख इलियाज,आदी मोठया संख्येने अंध बंधू –भगिनी उपस्थित होते...

# संपादकीय

## ट्रम्प यांना चपराक


‘हम करे सो कायदा’ ही अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची प्रवृत्ती. युक्रेन–रशियातील संघर्ष आपण म्हणू त्याच पद्धतीने संपुष्टात आला पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. राष्ट्राध्यक्ष झाल्यावर चुटकीसरशी ही समस्या सोडवीन, अशी गर्जना त्यांनी केली होती; पण ते सत्तेवर येऊन जवळपास साडेचार महिने होऊनही हा संघर्ष संपलेला नाही. अमेरिकेत येणार्या मालावर प्रचंड कर लादून, त्यांनी काही काळ जगाला अस्थिर केले; पण नंतर त्यांना काही प्रमाणात नमतेही घ्यावे लागले. शिवाय बोलायचे एक आणि करायचे एक, हा त्यांचा स्वभाव. त्यामुळे राष्ट्राध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारताच ‘अमेरिका दहशतवादाची पाठराखण करणार नाही’ अशी गर्जना त्यांनी केली; पण पाकिस्तानला आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक बँकेमार्फत भरघोस मदत होईल, याची काळजीही अमेरिकेनेच घेतली. ॲपल कंपनीने आयफोन मोबाईल संचांचे उत्पादन चीनऐवजी मोठ्या प्रमाणात भारतात करण्याचे ठरवले, तेव्हा त्यांनी त्यास विरोध केला. हे उत्पादन अमेरिकेतच करावे, असा हट्ट त्यांनी धरला, तेव्हा अमेरिका–चीन तणावानंतर व ‘टॅरीफराज’नंतर आयफोनचे उत्पादन भारतातच करण्याचे ॲपलचे मुख्य कार्यकारी अधिकारी थॉमस टीम कुक यांनी ठरवले होते; पण हे उत्पादन भारतात केल्यास किमान २५ टक्के आयात शुल्काचा सामना करावा लागेल, असा थेट इशारा ट्रम्प यांनी ॲपलला दिला आहे. हार्वर्ड विद्यापीठात आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यास मनाई करण्याचा निर्णय नुकताच त्यांनी घेतला होता. याविरोधात हार्वर्डने मॅसेच्युसेटस्मधील अमेरिकन जिल्हा न्यायालयात खटला दाखल केला. त्याची दखल घेत हा निर्णय न्यायाधीशांनी रोखला.

एकप्रकारे ट्रम्प यांना सणसणीत चपराकच मिळाली. विद्यापीठाने तेथे शिकणार्या विदेशी विद्यार्थ्यांबद्दलचे रेकॉर्ड सादर करण्यास नकार दिल्याने होमलँड सिक्युरिटी विभागाने विदेशी विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचा विद्यापीठाचा अधिकार रद्द केला. विद्यापीठ परिसरातील हिंसाचार, ज्यूविरोधात भडकावण्यात येणार्या भावना, पॅलेस्टिनी समर्थकांच्या निदर्शकांना पाठिंबा देणे असे आरोप हार्वर्डवर ठेवले होते. हार्वर्ड हे चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या कारवायांचे केंद्र बनले असल्याची टीकाही करण्यात येत होती; मात्र हार्वर्ड विद्यापीठ हे ताठ कण्याचे असून, त्यांनी ट्रम्प यांच्या दादागिरीपुढे न झुकण्याचे ठरवले. सरकारची कृती ही अमेरिकेच्या घटनेतील पहिल्या दुरुस्तीचे उल्लंघन करणारी आहे. सरकारने योग्य प्रक्रिया किंवा कारण न देता अचानक विद्यापीठाची मान्यता रद्द केली. त्यामुळे हार्वर्ड आणि तेथील सात हजारांवरील विद्यार्थी व्हिसाधारकांना त्याची झळ पोहोचली. सरकारने हार्वर्डच्या विद्यार्थी संघटनेचा एकचतुर्थांश भाग नष्ट करण्याचा प्रयत्न केला, असा युक्तिवाद करण्यात आला. त्याची न्यायालयाने तत्परतेने दखल घेतली. विद्यापीठात अतिथी आदान–प्रदान कार्यक्रमांतर्गत शिकण्यासाठी येणार्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना आडकाठी करण्यासाठी हार्वर्ड विद्यापीठाचे संबंधित प्रमाणपत्र रोखण्याचा प्रयत्न झाला; पण न्यायालयाच्या तात्पुरत्या प्रतिबंधात्मक आदेशामुळे आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांच्या प्रवेशास अपात्र ठरवण्याचा ट्रम्प सरकारचा निर्णय रोखण्यात आला.

सरकारच्या निर्णयामुळे भारतातील ८०० विद्यार्थ्यांसह विविध देशांतील हजारो विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वैधतेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. हार्वर्डमधून हजारो विद्यार्थी उत्तीर्ण होण्याच्या थोडे दिवस आधीच हा निर्णय जाहीर करण्यात आला होता. सध्या विद्यापीठात जगभरातील १० हजार १५८ विद्यार्थी आणि तज्ज्ञ शिकतात. या अविचारी निर्णयामुळे हार्वर्डला विदेशी विद्यार्थ्यांना दाखलच करून घेता येणार नव्हते आणि सध्या विद्यापीठात असलेल्या विद्यार्थ्यांनी दुसर्या ठिकाणी आपली बदली करून न घेतल्यास त्यांची वैधताच संपुष्टात येणार होती. हा निर्णय प्रमाणिकपणे आणि कष्टाने उच्च शिक्षण घेणार्या विद्यार्थ्यांमध्ये अस्वस्थता निर्माण करणाराच होता. विद्यार्थ्यांनी अभ्यास करायचा की यात वेळ घालवायचा, हा खरा प्रश्न! म्हणूनच न्यायालयाने हा निर्णय तात्पुरता तरी स्थगित केला, हे योग्यच घडले. हार्वर्ड हे जगप्रसिद्ध विद्यापीठ असून, जॉन ॲडम्स, रुदरफोर्ड, बी. हेस, थिओडोर रुझवेल्ट, फ्रँकलिन डी. रुझवेल्ट, जॉन एफ. केनेडी, जॉर्ज डब्ल्यू बुश व बराक ओबामा हे अमेरिकेचे पूर्वाध्यक्ष हार्वर्डमध्ये शिकले. रतन टाटा, राहुल बजाज, आनंद महिंद्र यासारखे उद्योगपती किंवा सुब–मण्यम स्वामी, जयंत सिन्हा, पी. चिदंबरम व कपिल सिब्बल यांच्यासारखे बुद्धिमान राजकीय नेते हार्वर्डमध्येच घडले. यापूर्वी ट्रम्प यांनी हार्वर्ड विद्यापीठाचा २.२ अब्ज डॉलरचा सरकारी निधी रोखला आणि विद्यापीठाच्या कर सवलतीही रद्द करण्याची धमकी दिली. हा निधी थांबवल्याने पिडियाट्रिक कर्करोग, अल्झायमर आणि पार्किन्सन या विषयांतील महत्त्वाच्या संशोधनावर परिणाम होईल, असा इशारा हार्वर्डचे अध्यक्ष ॲलन गार्बर यांनी अमेरिकन सरकारला लिहिलेल्या पत्रात दिला होता. गार्बर हे स्वतः एक ज्यू असून, विद्यापीठ परिसरात ज्यूंच्या विरोधात काही गोष्टी घडत असल्यास त्याच्या निराकरणासाठी त्यांनी कृती गटही स्थापन केला. ज्यू आणि मुस्लीमविरोधी पक्षपाताची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या कृती गटाचा अहवाल विद्यापीठ प्रसिद्ध करेल, असे आश्वासनही त्यांनी दिले होते.

# समता दिंडीतील एक वारकरी : पांडूरंग देडे.

परिवर्तवादी सामाजिक चळवळीतील एक बिन्नीचे सक्रिय कार्यकर्ते पांडूरंग देडे, हे परवा सेवा निवृत्त झाले. त्यांच्या या निवृत्तीनिमित्त, देडे यांच्या संघटनात्मक व सार्वजनिक कार्याचा संक्षिप्त परिचय देणारा,मुख्याध्यापक विजय चव्हाण यांनी,पांडुरंग देडे : सामाजिक चळवळीचे उर्जाकेंद्र हा एक गौरवग्रंथ संपादित केला आहे. आणि परवा त्याचे प्रकाशन मातोश्री शांताबाई वसंतराव काळे, मराठवाडा पदवीधर संघाचे आ.सतीष चव्हाण, मराठवाडा शिक्षक मतदार संघाचे आ.विक्रम काळे, माजी कुलगुरू प्राचार्य डॉ.मधुकरराव गायकवाड आदी मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये करण्यात आले. या ७८ पानी गौरवांकामध्ये विभिन्न असे एकूण २३ लेख आहेत. तर माजी मंत्री दिलीप देशमुख, माजी खा.तथा कुलगुरू डॉ.जनार्दन वाघमारे व माजी मंत्री आ. अमित देशमुख आदींचे उत्तम शुभेच्छा संदेश आहेत. अर्थात देडे यांच्या वाटचालीप्रमाणे, ग्रंथारंभीच पं.पु.साने गुरुजींचे प्रेमळ प्रतिमा चित्र पानभर साकारले आहे. दिवंगत आ.वसंतराव काळे, विजय चव्हाण आणि राष्ट्र सेवादल, हे पांडूरंग देडे यांच्या जीवनातील महत्वाची ’ वळण केंद्र ’ ठरली. त्यामुळे एक पूर्वापार उपेक्षित वंचित समाज घटकांतील एक सामान्य नाव, कष्ट व मेहनतीच्या बळावर पुढे अखंड ३–४ दशके, सार्वत्रिक विविध पटलांवर कायम चर्चेत राहिले. अशी संधी केवळ देडेंनाच मिळते वा मिळाली असे नाही. तर ती भिन्न स्वरुपात बहुतांशांना येते. मात्र अशा छुप्या काटेरी वेदनांच्या आसनी आरुढ होऊन, समर्पणाने हसत आयुष्य रितं करणे हे,अशा एखाद्या पांडूरंगी वृत्तीलाच पेलत असते. अन्यतः बेगडी विद्वानकीच्या खोट्या ओझ्याखाली, व्यवहारवादाने खुंटलेली आणि अवघ्या दोन कुटुंबाच्या नात्यात स्व आयुष्य संपलेल्या ओसाड वस्त्यांची संख्या कोठेही कांही कमी नाही. मात्र अशा फसव्या व अप्रामाणिक मुर्दाडांचे आबंट बोचरे शेजारपण, स्वतः पांडूरंग देडे व त्यांच्या सहचारिणी प्रेमाताईंनी आपल्या जीवनात मोठया कटाक्षाने अव्हेरले. आणि त्यामुळेच गावकुसाबाहेरचे एक शोषित गुलाम कुटुंब हे ज्ञान,कर्तृत्व आणि संस्कारांच्या बळावर संबंध समाजात एक दिपस्तंभ ठरले.या देडे परिवाराने ज्ञान,विवेक व प्रांजळतेची कास धरलीच. मात्र त्यास लोकशाही, स्वातंत्र्य आणि संविधानाची प्रबळ हमी होती. हाच या गौरवांकातील मांडणीचा एकूण समग्र लेखनसार आहे. पांडूरंग देडे : सामाजिक चळवळीचे उर्जा केंद्र या गौरवांकात ३ विशेष वैचारिक लेख आहेत. आणि दिवंगत बापुसाहेब काळदाते यांची,’मराठवाड्यातील सेवा दल कार्य ’ ही अत्यंत उपयुक्त अशी एक पूर्व कृती मुलाखत आहे. तत्कालीन ही मुलाखत विजय शिंदे यांनी घेतलेली आहे. हा वाचकांसाठी अत्यंत प्रमाणित बोलका दस्त आहे. काळदाते हे आपल्या या मुक्त संवादात स्मरण देतात की, मृत्युपूर्वी साने गुरुजी यांनी एकदा सांगलीच्या शिबिरात सांगितले, देशाला स्वातंत्र्य मिळावयाचे होते ते मिळाले.आता आपण देशाच्या पुनर्रचनेच्या कामात भाग घेतला पाहिजे. मिळालेले स्वातंत्र्य परिपूर्ण करण्यासाठी, आपण खेड्या–पाड्यात जाऊन तेथील लोकोपयोगी काम केली पाहिजे.आणि माझ्या गावासाठी, माझ्या देशासाठी मला कांही केलं पाहिजे, अशी इच्छाशक्ती आणि लोकसहभाग हा राष्ट्र सेवा दलाच्या सेवा पथकामुळेच मनोमनी वृद्धिंगत झाला. माझी सैद्धांतिक, वैचारिक बैठक व समजावून सांगण्याची पध्दती मी प्रधान मास्तरांकडून शिकलो. एसेम जोशींमुळे सेवादल खर्या अर्थाने समाजवादी होते. एसेम म्हणायचे, ’ राष्ट्रसेवा दल हा स्वल्पविराम असून, समाजवादी आंदोलन हा पूर्णविराम आहे ’असे विचारपूर्ण अनेक अनुभव त्यांनी कथन केले आहेत. या गौरवांकातील अन्य २ वैचारिक लेख हे, थोर विचारवंत तथा संपादक प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांची आहेत. ’ सामाजिक कार्यकर्ता : परिवर्तनाचा आधार ’ आणि ’ सामाजिक कार्याच्या दिशा ’ सदर दोन्ही लेख पूर्व प्रकाशित आहेत. डॉ. कुंभार यांनी संपादित केलेल्या ’ सामाजिक कार्याची दिशा ’ या ग्रंथातील आहेत. अतिशय मुलभूत चिंतन असलेले हे लेख, गेली ३ दशके महाराष्ट्राच्या सामाजिक क्षेत्रात सर्वत्र दिशा दिग्दर्शन करतात. सखोल व व्यापक अशी बारकाव्याने, तपशीलवार दूरगामी मांडणी यात केलेली आहे. सामाजिक संघटना व संस्थांसह अभ्यासक, हितचिंतक व कार्यकर्त्यांमध्ये साक्षेपी संदर्भ म्हणून, याचा सार्वत्रिक व नियमीत वापर होतो. कार्यकर्त्यांच्या सामाजिक व वैचारिक जडण–घडणीची ही एक आदर्श संहिताच आहे. कार्यकर्त्यांचा व्यक्तीमत्व विकास, बौद्धिक शिबिर, अभ्यास वर्ग अथवा कार्यशाळेसाठी भक्कम आणि पुरेसे प्रतिनिधित्व करतात. थोर तत्ववेत्ते डॉ. कुंभार यांनी वेळदेऊन, परिश्रमपूर्वक व जाणिवपूर्ण जिव्हाळ्याने हे ग्रंथ संपादन केलेले आहे. या पुस्तकांसह लेखांवर सार्वजनिक चर्चा व्हावयास हवी. हे दोन्ही लेख शासन,लोकप्रतिनिधी व प्रशासनाससुद्धा एक आधारभूत सूत्र ठरतात. आजपर्यंतही यात कांही वृद्धी वा सुधारणांची आवश्यक्ता जाणवलेली नाही. परंतू खरी आवश्यकता आहे ती, शासनाने हा ग्रंथरुपी कार्यक्रम स्वीकारून तो अंगीकारावयास हवा. आणि समाज व संस्थांनी कटाक्षाने हा कृती कार्यक्रम राबवून,त्याची अंमलबजावणी केली पाहिजे. शासनाकडून याचा घोरणात्मक दृष्टया विचार होवो अथवा न होवो. मात्र विचारवंतांसह संस्था, संघटना आणि समाजाने याचा स्वंयप्रेरणेने स्वीकार करावयास हवा,अशी अनुषंगिक आग्रही अपेक्षा पोहचवावी वाटते. पांडूरंग देडे : सामाजिक चळवळीचे उर्जाकेंद्र या गौरवांकात, कौटुंबिक व हृदयस्पर्शी असे खास ३ लेख आहेत. ऋषीकेश देडे यांचा ’ आमचे पिताश्री आमचे योगदान.’ तर कु. अस्मिता देडे यांनी लिहिलेला ’ जीवनाचा आनंद पांडुरंग ’ हे दोन लेख,परिवारातील भावनिक ओलावा अधिक घट्ट करणारे आहेत. आणि खुद्द प्रेमाताई देडे यांचा, ’ प्रेम रंग ’ हा लेख संयत व गंभीर आहे. त्या अत्यंत तटस्थपणे आपल्या पायावर उभे राहून, वास्तवदर्शी धीरगंभीर अशी वाटचाल करतात. आपल्या मातृत्व व पत्नीत्वाचे कर्तव्य, आनंदी जाणिवेने जागरूकपणे त्या पार पाडतात. संपूर्ण कुटुंबास त्याग आणि अंतःकरणाने खंबीर बनवतात. हे व्यक्तीमत्व प्रेमळ व समंजस आहे. या आधुनिक रुक्मिणीच्या ज्ञान व अनुभवाने, हा सर्व सेवारथी पांडुरंग अधिक भक्कम झाला हे सत्य. तर आनंद चव्हाण यांचा, ’ माणुसकीची जाण असलेले पांडुरंग देडे ’ आणि प्रा.डॉ.व्यंकट सुर्यवंशी यांचा ’ माझे प्रेमळ सासरे : पांडुरंग देडे ’ हे २ लेख अत्यंत समर्पक आहे. तसेच स्वतः पांडुरंग देडे यांनी लिहिलेला, ’ आमची प्रेरणा – आ. वसंतराव काळे ’ हा लेखपण नाते व स्मृती आधिक घट्ट करणारा आहे. या शिवाय विजय देवडे, प्राचार्य डॉ.सोमनाथ रोडे, डॉ.शिवाजी जवळगेकर, पत्रकार बाळ होळीकर, शिवाजी नरहरे, प्रा.बाबासाहेब सोनवणे, डॉ.सिध्दार्थ सुर्यवंशी, प्रभाकरराव चोचंडे, प्रा.डॉ.रब्बानी शेख, भरत सुर्यवंशी, लिंबराज कांबळे, प्रा.लक्ष्मण देडे यांचे लेख सुद्धा,पांडुरंग देडे यांच्या वेग–वेगळ्या व्यक्तीमत्व पैलूंचे, वाचनीय पदर उलगडणारे आहेत. या सर्वच लेखामधून पांडूरंग देडे हे प्रेमळ, मोठ्या मनाचे व सर्वांच्या मदतीला केव्हाही धावून जाणारे!असे एक समान व्यक्तीसूत्र आहे. तसेच देडे म्हणजे सामाजिक एक साथी,संघटनात्मक सेवाभावी कार्यकर्ता,लोभस मित्र,कर्मचारी तथा कामगा,पुढारी, भला नातेसंबंधी आणि जबाबदार कुटुंब प्रमुख असे,त्यांचे बहुआयामी सुरेख व्यक्तीचित्रण या गौरवांकात आलेलं आहे. शेवटी काय तर, येथे पांडुरंग देडे यांच्याकडे गमावण्यासारखे पूर्वापार असे कांही नसल्याने, त्यांनी सामाजिक मुल्यात्मक असे अधाशासारखे रग्गड कमावले. याचा कोणास पण हेवा वाटावा. बर्याच चढ – उतारांचे आयुष्य भोगलेला हा व्यक्ती, परिवर्तनाच्या लढ्यातील कणखर मनाचा सैनिक आहे. मुळात लवचिकत्व लाभलेलं हे पात्र, पुढे मुक्त मंचावर अधिक विस्तृत व जोमदार झालं. ही चळवळीच्या अंगाने एक सुखद घटना आहे. आज देडे यांच्या कुटुंबाची स्थिती ही सामाजिक, शैक्षणिक व बौद्धिक दृष्टिने सुबक आहे. शिवाय आज त्यांच्या हाताशी तसा आधिकार व हक्कही प्राप्त आहे. त्यामुळे या परिवारांने आपल्या उपेक्षित, शोषित व अज्ञानाच्या खोल गर्तेत भरकटलेल्या समाजाच्या, वैचारिक व परिवर्तवादी भरण–पोषणासाठी वेळ देऊन, एक मिशन समजून आवश्य सामूहिक प्रयत्न करावा, इतक्याच माफक मात्र कठीण अपेक्षेसह त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा.




********

गौरवांक समीक्षा

म
कर,
लातूर.
– रामकुमार रायवाडी
मुक्त – पत्रकार,
मो.९८९०४४४५२१

# बिहार सोडणार्‍यांची संख्या लक्षणीय



बिहारमध्ये पुढच्या वर्षी होणार्या विधानसभा निवडणुकीसाठी राजकीय पक्षांनी राजकीय डावपेच आखण्यास सुरुवात केली आहे. झारखंडमध्ये हेमंत सोरेन आणि महाराष्ट्रात महायुतीच्या विजयात महिलावर्गाचा मोठा वाटा राहिला आहे. त्यानंतर आता बिहारमध्ये देखील महिलांच्या मतपेढीवरून लढाई सुरू झाली आहे. यादरम्यान बिहारचे माजी उपमुख्यमंत्री आणि राजदचे नेते तेजस्वी यादव यांनी घोषणा करत बिहारमध्ये राष्ट्रीय जनता दलाचे सरकार आल्यास राज्यातील महिलांना दरमहा अडीच हजार रुपये आर्थिक मदत दिली जाईल, असे जाहीर केले.

राजकीय तज्ज्ञांच्या मते, केवळ जातीय समीकरणांच्या आधारे निवडणुकांचा आणि जनमताचा लोलक आपल्या बाजूने फ़िरवता येणे शक्य नाहीये याची जाणीव तेजस्वी यादवांसह सर्वच विरोधकांना झाली आहे. जातीय समीकरणांबरोबरच ‘आधी आबादी’ असणार्या महिलांचा विचार प्राधान्याने केल्याशिवाय गत्यंतर नाही, हेदेखील महाराष्ट्र, झारखंड, मध्य प्रदेश, कर्नाटक या राज्यांतील निवडणूक निकालांनी स्पष्ट केले आहे. म्हणून विधानसभा निवडणूक जिंकण्यासाठी महिला वर्गांना आकर्षित करण्यासाठी राजदने प्रयत्न सुरू केले आहेत. तेजस्वी यादव यांच्या घोषणेनंतर मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी सुरू केलेली ‘महिला संवाद यात्रा’ त्यास प्रत्युत्तर मानले जात आहे.

राजदचे नेते तेजस्वी यादव यांनी म्हटले की, राजदचे सरकार आल्यास राज्यातील भगिनी आणि मातांसाठी ‘माई–बहन’ योजना सुरू केली जाईल. यानुसार आर्थिक रूपातून कमकुवत महिलांना सरकारकडून अडीच हजार दरमहा दिले जातील. सरकार स्थापन झाल्यानंतरच महिनाभरातच ही योजना कार्यान्वित केली जाईल, माता आणि भगिनींच्या अडचणी दूर करण्यासाठी राजद सरकारकडून प्रयत्न केले जातील आणि तुमचे प्रश्न ते आमचे प्रश्न असतील. राज्यातील निम्म्या लोकसंख्येला न्याय द्यावा लागेल आणि सामाजिक न्यायाबरोबरच आम्ही आर्थिक न्याय देण्याचा देखील प्रयत्न करू, असेही यादव म्हणाले.

लोकसभा निवडणुकीच्या निकालातील धक्क्यातून सावरेपर्यंत अलीकडेच झालेल्या बिहार विधानसभा पोटनिवडणुकीमध्ये चार जागांवर राजदला मोठा धक्का बसला आहे. लोकसभा निवडणुकीत राजदला किमान चार जागांवर तरी विजय मिळाला होता; पण विधानसभा पोटनिवडणुकीत पक्षाला भोपळाही फ़ोडता आलेला नाही. पक्षाचा गड मानल्या जाणार्या मतदारसंघातही राजदला पराभवाचे तोंड पाहावे लागले.

बिहारमध्ये पुरुषांच्या तुलनेत महिला मतदारांची संख्या कमी आहे; परंतु महिलांचा मतदान करण्याचा टक्का पुरुषांपेक्षा अधिक आहे. या राज्यात दर हजार पुरुष मतदारांमागे महिला मतदारांची संख्या ९०७ इतकी आहे. परंतु मतदानातील सहभागाचा विचार करता महिलांचे प्रमाण पुरुषांपेक्षा अधिक आहे. २०२४च्या लोकसभा निवडणुकांमध्ये बिहारमध्ये एकूण ५६.२८ टक्के मतदान झाले. यामध्ये ५३ टक्के पुरुष आणि ५९.४५ टक्के महिला मतदारांनी मतदान केले. म्हणजेच पुरुषांच्या तुलनेत मतदान करणार्या महिलांचे प्रमाण ६.४५ टक्के अधिक होते. २०१९ मध्ये पार पडलेल्या बिहारमधील विधानसभा निवडणुकांमध्ये एकूण मतदारांची संख्या ७ कोटी १२ लाख १६ हजार २८६ इतकी होती. यामध्ये पुरुष मतदारांची संख्या ३.७६ कोटी तर महिला मतदारांची संख्या ३.३५ कोटी इतकी होती. त्यावेळी विधानसभेला ५७.३३ टक्के मतदान झाले. यामध्ये पुरुषांची मतदानाची टक्केवारी ५४.९० टक्के होती; तर महिलांचे मतदानाचे प्रमाण ५९.५८ टक्के होते.

बिहारमध्ये महिला मतपेढीवर मुख्यमंत्री नितीशकुमार यांची चांगली पकड आहे. तज्ज्ञांच्या मते, त्यांच्या विजयात महिला मतदारांचा मोठा हात राहिला आहे. बिहारचे मुख्यमंत्री म्हणून कार्यरत असताना नितीशकुमार यांनी २००५ मध्ये नगर पंचायतींमध्ये महिलांना आरक्षण देण्याचा निर्णय घेतला होता. याखेरीज मुलींना सायकल देण्याच्या त्यांच्या योजनेची देशभर चर्चा झाली होती. राज्यातील मुली आणि महिलांच्या कल्याणासाठी अनेक योजना सुरू केल्या. विद्यार्थिनींना आर्थिक मदत देणारी योजना राबवली. महिला बचत गटांच्या मागणीवरून २०१६ मध्ये बिहारमध्ये दारूबंदीही त्यांनी केली. अनेक योजनांची चांगली अंमलबजावणी केल्यामुळे नितीशकुमारांची महिला व्होटबँक भक्कम बनत गेली.

या सर्वांचे आकलन करून राजदने महिला मतदारांना आकर्षित करण्यासाठी प्रस्तावित योजना आणली आहे. बिहारच्या विविध भागात राजदचे नेते दौरे काढत आहेत. या दौर्यांमधून बिहार सरकारच्या उणिवांवर प्रकाश टाकण्याचे काम केले जात आहे. पण मुख्य लक्ष्य आहे ते महिला मतदारांवर.

दुसरीकडे, मुख्यमंत्री नितीशकुमार यांनीही आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संवाद यात्रा आरंभली आहे. या यात्रेवर टीका करताना तेजस्वी यादव यांनी मुख्यमंत्री दोन अब्जापेक्षा अधिक खर्च करत असल्याचा आरोप केला. ही रक्कम अनाठायीपणे खर्च केली जात आहे असे म्हटले आहे. तसेच निती आयोगाचा अहवाल पाहिला तर बिहार सोडून जाणार्यांची संख्या अजूनही लक्षणीय आहे आणि यात बिहार पहिल्या क्रमाकांवर आहे.

बेरोजगारीच्या बाबतीत बिहार पहिल्या स्थानावर आहे. त्यामुळे एवढ्या सधन राज्यातून लोकांना बाहेर का जावेसे वाटते, याचा विचार करायला हवा, असाही टोला त्यांनी लगावला. राबडीदेवी या बिहारच्या पहिल्या आणि एकमेव महिला मुख्यमंत्री होत्या; परंतु बिहारची जनता अजूनही लालूप्रसाद यादव, राबडीदेवी यांच्या पंधरा वर्षांची राजवट विसरलेली नाही. त्यामुळे तेजस्वी यादवांच्या घोषणांचा कितपत उपयोग होईल याबाबत साशंकता आहे. सत्तेत येण्यासाठी तेजस्वी यादव यांनी यापूर्वी मुस्लीम–यादव मतांवर लक्ष केंद्रित करण्याचा प्रयत्न केला आणि आता ते रोख निधी हस्तांतर योजनांबरोबरच महिला मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करत आहेत. १९९० च्या दशकांत लालूंच्या कुटुंबाने बिहारवर राज्य केले आहे.

नितीशकुमारदेखील मध्य प्रदेशची ‘लाडली बहन योजने’च्या आधारावर बिहारमध्ये महिलांसाठी योजना लागू करण्याच्या विचारात आहेत. या योजनेनुसार १८ ते ५० वर्षे वयोगटातील महिलांना दरमहा हजार रुपये देण्याचा विचार आहे. शिवाय स्वयंसहायता समूहाशी संबंधित महिलांसाठी निर्णय घेतले जाऊ शकतात. २०१५ मध्ये नितीशकुमार यांच्या सरकारने बिहारमध्ये स्वयं साहाय्यता समूहाची स्थापना केली होती. सध्या राज्यात ११ लाख समूह सक्रिय आहेत. प्रत्येक समूहात दहा महिला आहेत. सरकार या समूहांना दिलेले कर्ज माफ़ करण्याचा विचार करत आहे. असा निर्णय घेतल्यास त्याचा थेटपणे लाखो महिलांना लाभ मिळणार आहे. एकंदरीत बिहारची यंदाची निवडणूक आणि त्यापूर्वीची राजकीय रणधुमाळी ही पूर्णतः महिलाकेंद्री असणार हे स्पष्ट झाले आहे. महाराष्ट्र, झारखंड, मध्य प्रदेश, कर्नाटक, दिल्ली आणि आता बिहार असे करत करत संपूर्ण देशाच्याच राजकारणामध्ये महिला केंद्रस्थानी येत आहेत, हे एक परिवर्तनच म्हणायला हवे.

याचे मुख्य कारण महिलांची मतदानाबाबतची सजगता आणि सक्रियता. आपले एक मत काय कमाल करू शकते, हे या परिवर्तनाने दाखवून दिले आहे.

# नॉनव्हेज खवय्यांसाठी पर्वणी! आता घरीच बनवा स्ट्रीट स्टाइल कुरकुरीत आणि मसालेदार

कुठे बाहेर खायला गेलो की चायनीज पदार्थांची मेजवानी ऑर्डर होतेच. भारतीयांना इंडो-चायनीज फूड खायला फार आवडतं आणि यातीलच एक लोकप्रिय आणि चविष्ट असा स्टार्टर्सचा प्रकार म्हणजे चिकन लॉलीपॉप! चायनीज खायला गेल्यावर अधिकतर लोक हा स्टार्टर आवर्जून ऑर्डर करतात. शिवाय अनेक लग्नसमारंभ आणि पार्टीजमध्येही हा पदार्थ सर्व्ह केला जातो. लहानांनाच काय तर मोठ्यांनाही याचे फार वेड. बाहेरून कुरकुरीत आणि आतमधील सॉफ्ट चिकनची चव अनेकांना या पदार्थाच्या प्रेमात पाडते.

सध्या विकेंडचा दिवस जवळ आला आहे अशात अनेकांच्या घरी नॉनव्हेजचा बेत असतो. तुम्हीही यंदाच्या विकेंडसाठी एक सोपी आणि कुरकुरीत रेसिपी शोधत असाल तर चिकन लॉलीपॉप तुमच्यासाठी एक उत्तम पर्याय आहे. अनेकांना हे ठाऊक नाही पण याची रेसिपी फार सोपी आहे आणि तुम्ही घरीच अगदी सहज मार्केटमध्ये मिळतात तसेच चिकन लॉलीपॉप घरी तयार करू शकता. चला याची संपूर्ण रेसिपी जाणून घेऊया.




साहित्य

चिकन लॉलीपॉप - १०-१२ (लॉलीपॉप कट केलेले)
आले-लसूण पेस्ट - १ टेबलस्पून
लाल तिखट - १ टीस्पून
हळद - ट टीस्पून
मीठ - चवीनुसार
सोया सॉस - १ टीस्पून
व्हिनेगर किंवा लिंबाचा रस - १ टीस्पून
मैदा - २ टेबलस्पून
कॉर्नफ्लोर - २ टेबलस्पून
अंडे - १ (पर्यायी)
तेल - तळण्यासाठी
लिंबाची फोड

कृती चिकन लॉलीपॉप तयार करण्यासाठी सर्वप्रथम चिकन लॉलीपॉपला धुवून कोरडे करून एका वाडग्यात काढून घ्या

यानंतर त्यात आले-लसूण पेस्ट, लाल तिखट, हळद, मीठ, सोया सॉस आणि व्हिनेगर टाका. चांगलं मिक्स करून ३० मिनिटांसाठी मॅरिनेट करून ठेवा

मग यात त्यात मैदा, कॉर्नफ्लोर आणि अंडं घालून मिश्रण चांगलं मिक्स करा, पीठ नीट मिसळत नसल्यास यात हलकं पाणी घाला

शेवटी एका कढईत तेल गरम करा आणि मॅरीनेट केलेले चिकन लॉलीपॉप यात एक एक करून सोडा

मध्यम आचेवर चिकन लॉलीपॉप तळा जोपर्यंत ते सोनेरी आणि कुरकुरीत होत नाहीत

गरमागरम लॉलीपॉप सर्व्हिंग प्लेटमध्ये काढा आणि शेजवान चटणीसह खाण्यासाठी सर्व्ह करा

कढईत तेल घालून त्यात बारीक चिरलेलं आलं, लसूण, मिरची, सोया सॉस, शेजवान चटणी आणि तयार लॉलीपॉप टॉस करून तुम्ही मसाला लॉलीपॉप तयार करू शकता

# संध्याकाळ होईल स्पेशल! शरीराची ऊर्जा वाढवण्यासाठी ५ मिनिटांमध्ये बनवा नोट करून घ्या रेसिपी

संध्याकाळच्या वेळी सगळ्यांचं भूक लागते. कामावरून घरी थकून आल्यानंतर काहींना काही खाण्याची इच्छा सगळ्यांचं होते. अशावेळी नाश्त्यात वडापाव, सामोसा किंवा शेवपुरी आणून खाल्ली जाते. मात्र नेहमीच तेलकट किंवा तिखट पदार्थांचे सेवन केल्यामुळे शरीराला हानी पोहचण्याची शक्यता असते. अतितेलकट पदार्थांच्या सेवनामुळे कोलेस्ट्रॉल किंवा मधुमेहाचा धोका वाढण्याची जास्त शक्यता असते. त्यामुळे संध्याकाळच्या वेळी पचनास हलके आणि पौष्टिक पदार्थ खावेत. आज आम्ही तुम्हाला १० मिनिटांमध्ये ॲपल शेक बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. सफरचंद खाणे आरोग्यासाठी अतिशय गुणकारी आहे. नियमित एक सफरचंद खाण्याचा डॉक्टरसुद्धा सल्ला देतात. ॲपल शेकचे सेवन केल्यामुळे शरीराला ऊर्जा मिळते आणि आवश्यक पोषक घटक मिळतात.




या शेकचे सेवन केल्यामुळे लवकर भूक लागत नाही. चला तर जाणून घेऊया ॲपल शेक बनवण्याची सोपी रेसिपी.

साहित्य:
सफरचंद
थंड दूध
मध
वेलची पावडर
बर्फाचे तुकडे
सुका मेवा

कृती: ॲपल शेक बनवण्यासाठी सर्वप्रथम, सफरचंद स्वच्छ धुवून घ्या. त्यानंतर त्याचा आतील बिया काढून तुकडे करा.

मिक्सरच्या भांड्यात सफरचंदाचे तुकडे, मध, थंड दूध आणि वेलची पावडर घालून मिक्स करा.

त्यानंतर त्यात बर्फाचे तुके आणि सुका मेवा घालून घट्टसर शेक तयार करा.


काचेच्या ग्लासात तयार केलेला शेक ओतून वरून बारीक करून घेतलेले सुका मेवा आणि सफरचंदचे तुकडे टाकून सर्व्ह करा.

तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेले ॲपल शेक.

# वॅक्सिनचा परिणाम आला संपुष्टात की प्रतिकारशक्ती झाली कमी? भारतात का पसरतोय करोना

जगभरात कोरोनामुळे पुन्हा एकदा भीतीचे वातावरण वाढले आहे. थायलंड आणि सिंगापूर सारख्या आग्नेय आशियाई देशांमध्ये त्याचे रुग्ण वेगाने वाढत आहेत. भारतातही कोरोनाच्या प्रकरणांमध्ये वाढ दिसून येत आहे.

'टीओआय'च्या अहवालानुसार, भारतातील आरोग्य अधिकारी अनेक राज्यांमध्ये कोरोनाच्या वाढत्या रुग्णांवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत. जरी एकूण राष्ट्रीय आकडेवारी पूर्वीच्या लाटांपेक्षा कमी असली तरी, चेन्नई, मुंबई आणि अहमदाबाद सारख्या शहरांमध्ये रुग्णांची संख्या वाढत आहे. मात्र याची नक्की कारणं काय आहेत असा पुन्हा एकदा प्रश्न आपल्या सगळ्यांना पडला आहे आणि तेच आपण या लेखातून जाणून घेऊया (फोटो सौजन्य - ळडींलज्ञ)



कोरोनाच्या वाढत्या केस

'टीओआय'च्या अहवालानुसार, आतापर्यंत एकट्या मुंबईत कोरोनाचे ९५ रुग्ण आढळले आहेत. राज्य आरोग्य विभागाच्या मते, हे आश्चर्यकारक आहे कारण जानेवारीपासून महाराष्ट्रात फक्त १०६ प्रकरणे नोंदवली गेली आहेत. सध्या रुग्णालयात किमान १६ कोरोना बाधित रुग्ण दाखल आहेत. पुढील संसर्ग रोखण्यासाठी काही रुग्णांना केईएम रुग्णालयातून सेव्हन हिल्स रुग्णालयात हलवले जात आहे. श्वसनाच्या समस्या आणि इन्फ्लूएंझा असलेल्या रुग्णांसाठी अधिकाऱ्यांनी कोरोना चाचणी देखील सुरू केली आहे.

कोरोना वाढण्याची कारणे

'टीओआय'च्या अहवालानुसार, कोरोनाव्हायरसच्या प्रकरणांमध्ये अलिकडच्या काळात वाढ होण्याचे मुख्य कारण म्हणजे त्याच्या उपप्रकारांची वाढती संसर्गजन्यता आणि लोकसंख्येमध्ये हळूहळू कमी होणारी प्रतिकारशक्ती. त्याच वेळी, अर्ध्याहून अधिक लोक संसर्ग आणि लसीकरणाद्वारे आधीच विषाणूच्या संपर्कात आले आहेत. त्या प्रतिकारशक्तीपासून मिळणारे संरक्षण कालांतराने कमी होत चालले आहे.

भारतातील कोविड

३ मे २०२५ रोजीच्या आठवड्याच्या शेवटी सिंगापूरमध्ये कोरोना संसर्गात २८ टक्के वाढ नोंदली गेली. हाँगकाँगमध्येही सकारात्मक चाचण्यांमध्ये झपाट्याने वाढ झाली, ४ आठवड्यात ६.२१ टक्क्यांवरून १३.६६ टक्क्यांपर्यंत वाढ झाली. हे नवीन प्रकाराच्या जलद प्रसाराचे लक्षण आहे. तज्ज्ञांचा असा विश्वास आहे की वाढत्या कोविड संसर्गामागील कारणे कमी होत जाणारी रोगप्रतिकारक शक्ती, पूर्वीच्या लसीकरणाची कमी प्रभावीता, सुरक्षा प्रोटोकॉलमध्ये शिथिलता आणि वाढता सामाजिक संपर्क ही आहेत. सध्या भारतातील बहुतेक प्रकरणे सौम्य आहेत. आतापर्यंत, यामुळे मृत्यू किंवा आयसीयूमध्ये दाखल झाल्याची कोणतीही घटना नोंदवली गेली नाही.

# हाडांना ठिसूळ करतात 'हे' पदार्थ, डाएटिशियनने सांगितले आजपासूनच रहा दूर

जर खाण्याच्या सवयी योग्य नसतील तर त्याचा आरोग्यावर वाईट परिणाम होतो. असे अनेक पदार्थ आहेत जे हाडांवर गरजेपेक्षा जास्त परिणाम करतात. जर हाडे कमकुवत होऊ लागली तर चालण्यास त्रास होतो आणि हाडे फ्रॅक्चर होण्याची शक्यता वाढते. अशा परिस्थितीत हाडांचे आरोग्य राखण्यासाठी आहाराची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे.

बऱ्याचदा लोकांना हाडे मजबूत करण्यासाठी कोणते पदार्थ खावे हे माहीत असते पण ते अशा पदार्थांकडे लक्ष देत नाहीत ज्यामुळे हाडे वितळतात किंवा खराब होतात. अशा परिस्थितीत, पोषणतज्ज्ञ किरण कुकरेजा यांनी इन्स्टाग्रामवरील त्यांच्या एका पोस्टमध्ये सांगितले आहे की कोणत्या गोष्टी खाल्ल्याने हाडे कमकुवत होतात. पोषणतज्ज्ञ म्हणतात की हे पदार्थ टाळणे विशेषतः महत्वाचे आहे




थंड पेये

पोषणतज्ज्ञांचे म्हणणे आहे की कोल्ड्रिंक्स आणि कार्बोनेटेड पेयांमध्ये फॉस्फोरिक ॲसिड असते आणि त्यांच्या सेवनाने हाडांमधील कॅल्शियम आणि फॉस्फरसचे संतुलन बिघडू शकते. अशा परिस्थितीत, जास्त फॉस्फरस आणि कमी कॅल्शियम असलेले पदार्थ कॅल्शियम कमी करणारे ठरतात. म्हणूनच हे पेये पिणे टाळणे महत्वाचे आहे.

कॅफिनेटेड पेये

जर कॅफिनयुक्त पेये जास्त प्रमाणात घेतली तर कॅल्शियम शरीरातून लघवीद्वारे बाहेर काढले जाईल. यामुळे शरीरात कॅल्शियमची कमतरता निर्माण होईल आणि हाडांची घनता कमी होऊ लागेल. कमी हाडांची घनता हाडांच्या समस्या निर्माण करते.

जास्त साखरेचे पदार्थ

जास्त साखरेचे पदार्थ, जास्त फ्रुक्टोज कॉर्न सिरप आणि माल्डोटेक्सेरिन यांचे जास्त सेवन केल्याने शरीरात इन्सुलिन प्रतिरोधकता आणि जळजळ वाढते, ज्यामुळे हाडे बांधणीच्या संप्रेरकांवर परिणाम होतो. या गोष्टींचे सेवन केल्याने मॅग्नेशियम आणि कॅल्शियमचे शोषण कमी होते आणि हाडांची ताकद कमी होऊ लागते.

हाडे मजबूत करण्यासाठी काय खावे

अंडी खाल्ल्याने शरीराला व्हिटॅमिन डी चांगल्या प्रमाणात मिळते जे हाडे मजबूत करण्यास मदत करते. अशा परिस्थितीत अंडी दररोज खाऊ शकतात हाडे मजबूत आणि निरोगी ठेवण्यासाठी दुधाचे सेवन केले जाऊ शकते. दूध हाडांच्या आजारांनाही दूर ठेवते


कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डी मिळविण्यासाठी संत्र्याचा रस देखील सेवन केला जाऊ शकतो

दह्यामध्ये व्हिटॅमिन डी आणि कॅल्शियमचे प्रमाण चांगले असते. हाडांचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी, दही तुमच्या आहाराचा एक भाग बनवा मासे, चिकन, सुकामेवा आणि बियादेखील हाडांच्या आरोग्यासाठी खूप चांगले आहेत

# हृदयात पाणी जमा झाल्यानंतर शरीरात दिसून येतात 'ही' भयंकर लक्षणे, दुर्लक्ष केल्यास उद्भवेल मृत्यूचा धोका

निरोगी आरोग्यासाठी शरीराचा प्रत्येक अवयव अतिशय महत्वाचा आहे. त्यामुळे शरीरातील सर्वच अवयवांची योग्य काळजी घ्यावी. हृद्य शरीराच्या प्रत्येक अवयवाला रक्त पोहचवण्याचे काम करते. याशिवाय हृदयाच्या कार्यात अडथळे निर्माण झाल्यानंतर संपूर्ण शरीराचे कार्य बिघडते. त्यामुळे नेहमीच चुकीची जीवनशैली फॉलो करता शरीरासाठी आवश्यक असलेले पदार्थ, भरपूर पाण्याचे सेवन इत्यादी अनेक गोष्टींकडे व्यवस्थित लक्षणे देणे आवश्यक आहे. बऱ्याचदा पोट, लिव्हर किंवा शरीराच्या इतर अवयवांमध्ये पाणी जमा होण्याची शक्यता असते. हेच पाणी हृदयाच्या अवतीभोवती तयार झाल्यास शरीरात अनेक बदल दिसून येतात. या स्थितीला पेरिकार्डियल इफ्यूजन असे म्हंटले जाते.

हृदयाच्या अवतीभोवती पाणी तयार झाल्यानंतर शरीराच्या कार्यात अनेक अडथळे निर्माण होतात. यामुळे हृदयाच्या बाहेरील थरामध्ये द्रव पदार्थ साचण्यास सुरुवात होते, ज्यामुळे हृदयावर दाब येतो. पण शरीरात सौम्य लक्षणे दिसू लागल्यास डॉक्टरांच्या सल्ल्याने उपचार करावे, अन्यथा हा आजार आणखीनच गंभीर होऊ शकतो. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला हृदयात पाणी जमा झाल्यानंतर शरीरात कोणती लक्षणे दिसू लागतात, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत.



छातीमध्ये जडपणा जाणवणे:

हृदयाच्या अवतीभोवती पाणी साचल्यामुळे हृदयावर दाब येऊ लागतो. यामुळे शरीरात जडपणा जाणवणे किंवा छातीमध्ये वेदना होऊ लागतात. ही समस्या प्रामुख्याने झोपल्यानंतर अधिक जाणवते. शरीरात साचून राहिलेले द्रव पदार्थ हृदयावर दाब टाकतात. त्यामुळे तुम्हाला हार्ट अटॅक सारखी लक्षणे दिसू लागतात. छातीमध्ये वारंवार अस्वस्थता जाणवू लागल्यास डॉक्टरांच्या सल्ल्याने उपचार करावे.

सतत थकवा किंवा अशक्तपणा जाणवणे:

हृदयाच्या कार्यात अडथळे निर्माण झाल्यानंतर शरीरात सतत थकवा किंवा अशक्तपणा जाणवू लागतो. शरीरातील अवयवांना पुरेशा प्रमाणात ऑक्सिजनयुक्त रक्त व्यवस्थित पोहचत नाही. यामुळे शरीरातील पेशींना ऊर्जा न मिळाल्यामुळे सतत थकवा किंवा अशक्तपणा जाणवू लागतो. बऱ्याचदा सहज करता येणाऱ्या गोष्टी खूप जास्त त्रासद्याक वाटू लागतात.

घशाला गाठ येणे किंवा सूज येणे:

हृदयात साचून राहिलेल्या पाण्यामुळे शरीराचा रक्तप्रवाह बिघडतो. याशिवाय साचून राहिलेल्या पाण्यामुळे शिरांमध्ये रक्ताचा दबाव वाढतो आणि गळ्याला सूज येऊ लागते. गळ्याला आलेल्या सुजेमुळे जेवणताना किंवा पाणी पिताना वेदना जाणवू लागतात. याशिवाय यामुळे गळ्याच्या रक्तवाहिन्या फुगल्या सारख्या दिसू लागतात. तसेच चेहऱ्याला सूज येणे, हातांवर सूज येणे इत्यादी लक्षणे दिसू लागतात.

## कडू कारलं आवडत नाही? मग सोप्या पद्धतीमध्ये बनवा कुरकुरीत कारल्याची चटणी, महिनाभर व्यवस्थित टिकून राहील पदार्थ

लहान मुलांपासून ते अगदी मोठ्यांपर्यंत अनेकांना कारल्याची भाजी खायला आवडत नाही. कारल्याच्या भाजीचे नाव घेतल्यानंतर लगेच नाक मुरडतात. मात्र आरोग्यासाठी कारल्याची भाजी अतिशय पौष्टिक आणि गुणकारी आहे. भाजीमधील कडवट पणामुळे कारल्याची भाजी कोणालाच खायला आवडत नाही. तर काहींच्या घरात कारल्याची भाजी आणलीच जात नाही. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला कडवट कारल्याची कुरकुरीत चटणी बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. कारल्याची कुरकुरीत चटणी घरातील लहान मुलांपासून अगदी मोठ्यांपर्यंत सगळ्यांचं खूप आवडेल. औषधी गुणधर्मानी समृद्ध असलेली कारल्याची भाजी मधुमेहाच्या रुग्णांसाठी अतिशय आरोग्यदायी ठरते. या भाजीपासून रस, भाजी किंवा कारल्याचे भरीत बनवले जाते. चला तर जाणून घेऊया कारल्याची चटणी बनवण्याची सोपी रेसिपी.

साहित्य: कारलं शेंगदाणे चणा डाळ पांढरी उडीद डाळ धणे कढीपत्ता मीठ लसूण लाल मिरच्या चिंच हिंग

कृती: कारल्याची चटणी बनवण्यासाठी सर्वप्रथम, कारली स्वच्छ धुवून घ्या. त्यानंतर त्यांच्या आतील बिया काढून कारली बारीक कापा.

कढईमध्ये तेल गरम करून त्यात शेंगदाणे भाजून घ्या. त्यानंतर त्याच कढईमध्ये चणा डाळ, पांढरी उडीद डाळ, धणे, जिरे, कढीपत्ता, लाल सुक्या मिरच्या, चिंच इत्यादी सर्व साहित्य टाकून भाजून घ्या.

त्यानंतर त्यात तेल टाकून त्यात लसूण पाकळ्या भाजून घ्या. त्याच कढईमध्ये पुन्हा एकदा कारल्याचे काप टाकून कुरकुरीत होईपर्यंत भाजून घ्या. भाजून घेतलेले सर्व साहित्य मिक्सरच्या भांड्यात घेऊन त्यात मीठ टाकून बारीक चटणी वाटून घ्या. तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेली कारल्याची चटणी.

# फेशिअलसारखी चमक येईल १० रुपयांमध्ये! 'या' पद्धतीने त्वचेवर लावा स्वयंपाक घरातील टोमॅटो, पिंग्मेंटेशन होईल गायब

उन्हाळा वाढल्यानंतर आरोग्यासह त्वचेमध्ये अनेक बदल दिसून येतात. या दिवसांमध्ये त्वचा अतिशय काळवंडून जाते. त्वचेचा रंग पूर्णपणे बदलून जातो. वाढत्या उन्हाळ्यात त्वचेवर वाढलेले टॅनिंग कमी करण्यासाठी महिला सतत काहींना काही करत असतात. वाढलेले टॅनिंग, त्वचेवरील चिकट किंवा तेलकटपणा इत्यादी अनेक गोष्टींमुळे चेहऱ्यावर पिंपल्स येणे, वांग येणे, फोड किंवा मुरूम येण्याची जास्त शक्यता असते. टॅनिंग वाढल्यानंतर चेहरा अतिशय काळा आणि निस्तेज दिसू लागतो. त्वचेवर वाढलेले टॅनिंग कमी करण्यासाठी महिला सतत काहींना काही उपाय करत असतात. कधी वेगवेगळ्या स्किन केअर प्रॉडक्टचा वापर केला जातो तर कधी बाजारात उपलब्ध असलेले महागडे प्रॉडक्ट वापरले जातात. चेहऱ्यावर वाढलेले टॅनिंग कमी करण्यासाठी महिला स्किन ब्राइटनिंग प्रॉडक्टचा वापर करतात. मात्र या क्रीम त्वचेसाठी अतिशय घातक आहेत. यामुळे चेहऱ्यावर रॅश किंवा इतर कोणत्याही समस्या उद्भवू लागतात. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला त्वचेवर वाढलेले टॅनिंग कमी करण्यासाठी टोमॅटोचा वापर कसा करावा, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. टोमॅटो त्वचेसाठी अतिशय प्रभावी आहे. यामध्ये असलेले घटक त्वचा आतून स्वच्छ करण्यासाठी मदत करतात. त्यामुळे कोणत्याही स्किन केअर प्रॉडक्टचा वापर करण्याऐवजी घरगुती उपाय करून त्वचेची योग्य ती काळजी घ्यावी. टोमॅटो फेशिअल करण्याची सोपी पद्धत: टोमॅटो फेशिअल करण्यासाठी सर्वप्रथम, टोमॅटोचा तुकडा कापून त्याच्या आतील बिया काढून घ्या. त्यानंतर त्यावर मध, बेसन घालून त्वचेवर हलक्या हाताने मसाज करून घ्या. यामुळे त्वचेवरील टॅनिंग निघून जाण्यास मदत होईल. ५ किंवा १० मिनिटं हलक्या हाताने टोमॅटो घासल्यानंतर त्वचा काहीवेळ अशीच राहून द्या. यामुळे त्वचेवरील टॅनिंग निघून जाऊन त्वचा अतिशय चमकदार आणि सुंदर होईल. याशिवाय टोमॅटो तुम्ही हात, पाय, पाठ किंवा मानेवर घासू शकता. यामुळे टॅनिंग कमी होईल. टॅनिंग घालवण्यासाठी इतर काही उपाय: चेहऱ्यावर वाढलेले टॅनिंग कमी करण्यासाठी बेसन अतिशय प्रभावी ठरते. बेसनाच्या पिठात चिमूटभर हळद टाकून मिश्रण तयार करा. तयार केलेले मिश्रण संपूर्ण चेहऱ्यावर लावून हलक्या हाताने मसाज करा आणि त्वचा पाण्याने स्वच्छ धुवून घ्या. हा उपाय नियमित केल्यास आठवडाभरात त्वचेवर वाढलेले टॅनिंग कमी होऊन चेहरा सुंदर दिसेल. त्वचेवर वाढलेली जळजळ आणि पुरळ कमी करण्यासाठी काकडीच्या रसाचा वापर करावा, काकडी आरोग्यासोबतच त्वचा हायड्रेट ठेवण्यासाठी मदत करते. यासाठी तयार केलेला काकडीचा रस त्वचेवर लावून काहीवेळ तसाच ठेवा. त्यानंतर त्वचा पाण्याने स्वच्छ धुवून घ्या.

# लातूर, पुणे,बीड व धाराशिव जिल्ह्यातून चोरी केलेल्या ०७ बुलेट मोटारसायकलीसह दोन आरोपीना अटक. ०६ गुन्हे उघड. स्थानिक गुन्हे शाखेचे पी आय संजीवन मिरकले व टीमची कामगिरी.

लातूर :- लातूर, पुणे,बीड व धाराशिव जिल्ह्यातून चोरी केलेल्या ०७ बुलेट मोटारसायकलीसह दोन आरोपीना अटक. ०६ गुन्हे उघड. स्थानिक गुन्हे शाखेचे पी आय संजीवन मिरकले व टीमची कामगिरी.

या बाबत थोडक्यात हकीकत अशी की,पोलीस अधीक्षक श्री.सोमय मुंडे यांचे आदेशान्वये अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशनला घडलेले मालाविषयक गुन्हे उघडकीस आणण्याकरिता पोलीस अधिकारी व अंमलदार यांना सूचना व मार्गदर्शन करण्यात आले होते.

पोलीस स्टेशनला दाखल असलेल्या विशेषतः मोटारसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याकरिता विशेष पथके स्थापन करून गुन्हे उघड करण्याचे प्रयत्न सुरू होते .

त्या अनुषंगाने सदर पथके माहितीचे संकलन करीत असताना, माहिती घेत असताना दिनांक २५/०५/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला माहिती मिळाली की, काहीजण गरुडचौक,रिंग रोड जवळील मोकळ्या जागेत थांबून संशयितरित्या मोटरसायकली चा खरेदी-विक्री व्यवहार करीत आहेत. अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने दिनांक २५/०५/२०२५ रोजी सदर पथक तात्काळ गरुड चौक परिसरात पोचून बुलेट मोटार सायकलीसह थांबलेल्या इसमांना ताब्यात घेऊन त्यांच्या कडील मोटारसायकल संदर्भाने विचारपूस केली असता त्यांनी त्यांनी त्यांचे नाव सुरज बाळासाहेब गायकवाड, वय २१ वर्ष, राहणार मोगरा तालुका माजलगाव जिल्हा बीड. गणेश उर्फ संकेत सुरेश गंगात्रय, वय २४, राहणार आडस तालुका केज जिल्हा बीड.

असे असल्याचे सांगून त्यांनी इतर साथीदार नामे अंकुश बाबासाहेब नागरगोज वय २३ वर्ष, राहणार घागरवाडा तालुका धारूर जिल्हा बीड (फरार) एक विधी संघर्ष बालक राहणार केज जिल्हा बीड.

अशांनी मिळून लातूर, बीड, धाराशिव व पुणे जिल्ह्यातील वेगवेगळ्या ठिकाणाहून इनफिल्ड कंपनीचे ६ बुलेट व एक इतर मोटारसायकल चोरी केल्याचे सांगितले. त्यावरून नमूद आरोपीकडून त्याने चोरलेल्या मोटरसायकलच्या




चेसीस व इंजिन क्रमांक वरून पडताळणी केली असता पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीतील बुलेट मोटरसायकल चोरीचे दोन गुन्हे तर उर्वरित पोलीस ठाणे शिवाजीनगर बीड, ढोकी व भारती विद्यापीठ पोलीस ठाणे पुणे येथील पोलीस ठाण्याला चोरीचे गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यावरून ०५ लाख ९० हजार रुपये किमतीच्या सात मोटरसायकली जप्त करण्यात आले आहेत.

नमूद पुढील तपास कमी आरोपींना पोलीस ठाणे एमआयडीसी येथे पुढील कार्यवाहीस्तव ताब्यात देण्यात आले असून संबंधित पोलीस ठाणेचे पोलीस पुढील तपास करीत आहेत.

सदरची कामगिरी वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक राजाभाऊ घाडगे यांच्या नेतृत्वातील पथका मधील पोलीस अंमलदार युवराज गिरी, संजय कांबळे, विनोद चलवाड, राजेश कंचे, राहुल सोनकांबळे, मोहन सुरवसे, जमीर शेख, सिद्धेश्वर मदने, राहुल कांबळे तसेच सायबर सेल येथील संतोष देवडे, गणेश साठे, शैलेश सुडे यांनी पार पाडली.

# आमदार शेखर निकम यांनी चिपळूण शहराची मान्सूनच्या पार्श्वभूमीवर केली अधिकाऱ्यांसोबत पाहणी

चिपळूण/ प्रतिनीधी:- चिपळूण शहरातील नागरिकांना पावासाळ्यात विविध समस्यांना सामोरे जावे लागते. त्यातच कोकणात मान्सूनपुर्व पावसाचे आगमन झाले आहे. या पार्श्वभूमीवर आमदार शेखर निकम यांनी ऐरिकेशन व बी. एन. सी. विभागाचे अधिकारी, राष्ट्रीय महामार्ग अधिकारी, नगरपालिका अधिकारी, एस. टी. अधिकारी यांच्यासह चिपळूण शहराची पाहणी केली. चिपळूण शहरातील नागरिकांना पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर विविध समस्यांना तोंड द्यावे लागते. चिपळूण शहरात वाशिष्टी नदीला येणारा पूर व अतिवृष्टी यांमुळे शहर जलमय होते. आमदार शेखर निकम यांनी पावसाळ्यात शहरात वाशिष्टी नदीला येणारा पूर व अतिवृष्टी यांमुळे पाणी साचू नये यासाठी सातत्याने प्रयत्न करीत आहेत. आमदार शेखर निकम यांनी अधिकाऱ्यांसोबत चिपळूण





शहरातील पॉवर हाऊस, प्रांत ऑफीस, चिपळूण बी.एस.एन.एल ऑफिस, चिपळूण जिप्सी कॉर्नर, पेठमाप नाईक ब्रीज, मुरादपूर गणपती मंदिर येथील पाणी निचरा पाहणी केली. बहादूरशेखनाका येथील वाशिष्टी नदीवरील जुना ब्रीज व गणपती विसर्जन घाट पाहणी, एन्रॉन ब्रीज दुरुस्ती पाहणी, चिपळूण एस. टी. आगार येथील आगाराची नवीन उभारण्यात येणारी इमारत व पाणी निचरा पाहणी, वांगडे मोहल्ला येथील एस. टी. निवारा शेड मारणे व पाणी निचरा यांची पाहणी केली. त्याचबरोबर खेंड महालक्ष्मीनगर व कांगणेवाडी (दुर्गाआळी) येथील दरड कोसळणे संबंधीत भागाची व कामाची पाहणी केली. आमदार शेखर निकम यांनी पाहणी केलेल्या सर्व संबंधीत ठिकाणांच्या समस्या तातडीने सोडविण्याबाबत व उपाययोजना करण्याबाबत अधिकाऱ्यांना सुचना दिल्या.

## विद्यार्थ्यांची दिवसातून तीनवेळा घेणार हजेरी

मुंबई : प्रतिनिधी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी शालेय शिक्षण विभागाकडून तातडीने नव्या आदेशाची अंमलबजावणी राज्यातील सर्व शाळांमध्ये होणार आहे. यामध्ये विद्यार्थ्यांची उपस्थिती, शाळेतील सुरक्षा व्यवस्था तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या पार्श्वभूमीची पडताळणी यांसारख्या महत्त्वपूर्ण बाबींचा समावेश आहे.



दिवसभरात विद्यार्थ्यांची तीन वेळा हजेरी घेतली जाणार आहे. गैरहजर असलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांना तत्काळ एसएमएस पाठवण्यात येणार आहे. प्रत्येक शाळेमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे अनिवार्य असणार असून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-या-यांसाठी चारित्र्य प्रमाणपत्र बंधनकारक करण्यात आले आहे. तसंच, विद्यार्थ्यांमध्ये मानसिक तणाव निर्माण होऊ नये म्हणून समुपदेशक नेमण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

विद्यार्थी अनुपस्थित असल्यास पालकांना लगेचच कळवले जाणार आहे. सकाळी, दुपारी आणि संध्याकाळी विद्यार्थ्यांची हजेरी घेतली जाणार आहे. जिल्ह्यातील सर्व प्राथमिक शाळांना दिवसातून तीन वेळा हजेरी घेण्याबाबत निर्देश देण्यात आले असून यंदापासून सर्व शाळांमध्ये त्याबाबत अंमलबजावणी केली जाणार आहे. जर विद्यार्थी गैरहजर असेल तर त्याबाबतचा मेसेज पालकांना पाठवला जाणार आहे.

सीसीटीव्ही बंधनकारक विद्यार्थ्यांची हालचाल लक्षात ठेवण्यासाठी शाळेच्या सर्व परिसरात सीसीटीव्ही बसवणे अनिवार्य करण्यात आले आहे. यामुळे शाळेतील कोणताही अनुचित प्रकार टाळता येणार आहे. हे सीसीटीव्ही कॅमेरा वर्गाचे दरवाजे, कॉरिडॉर, प्रवेशद्वार, मैदाने तसेच स्वच्छतागृहांबाहेर लावणे बंधनकारण असणार आहे. या सीसीटीव्ही फुटेजचा मागील एक महिन्याचा व्हिडिओ बॅकअप ठेवणे आवश्यक करण्यात आले आहे.

शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या नेमणूक करताना पोलिस चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र घेणे, गुन्हेगारी पार्श्वभूमी असल्यास सेवा तत्काळ समाप्त करणे, मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह, प्रत्येक स्वच्छतागृहाजवळ परिसर, पाणी, प्रकाश आणि आपत्कालीन घंटा उपलब्ध असावी, असं नमूद करण्यात आले आहे.

## पुरी समुद्रकिना-यावर स्पीड बोट उलटली

पुरी : वृत्तसंस्था भारताचा माजी क्रिकेटपटू सौरव गांगुली याचा भाऊ स्नेहाशीष गांगुली आणि वहिनी अर्पिता गांगुली ओडिशातील पुरी येथे सुट्टीसाठी गेले होते. रविवारी ते समुद्रातील वॉटर स्पोर्ट्स ऍक्टिव्हिटी दरम्यान स्पीडबोटमध्ये होते, पण समुद्राच्या उग्र लाटांमुळे बोट उलटली आणि ते पाण्यात फेकले गेले. पण, बचावपथकाने घाईने धाव घेत दोघांनाही वाचवले. या घटनेचा एक व्हिडिओही समोर आला आहे, ज्यामध्ये स्पीडबोट उलटलेली दिसते आणि बचावपथक प्रयत्न करताना दिसते. दरम्यान, सौरवच्या वहिनी अर्पिता गांगुली यांनी अपघातानंतर गंभीर आरोप केले आहेत. बोटीवर प्रवाशांची संख्या खूपच कमी ठेवण्यात आली होती, ज्यामुळे ती असंतुलित होऊन उलटली, असे त्यांनी म्हटले आहे. समुद्र आधीपासूनच खूपच खवळलेला होता. बोटीची क्षमता १० प्रवाशांची होती, पण केवळ ३-४ प्रवाशांना घेऊन बोट समुद्रात गेली. आम्ही सुरुवातीला समुद्रात जाण्याबाबत शंका व्यक्त केली होती, पण बोट चालवणा-यांनी आम्हाला खात्री दिली की काही धोका नाही, असे अर्पिता गांगुली यांनी सांगितले.

त्यांनी पुढे सांगितले की, समुद्रात गेल्यावर काही क्षणांतच एक मोठी लाट आल्याने बोट उलटली. लाईफगार्ड्स वेळेवर आले नसते, तर आम्ही वाचलो नसतो. आम्ही अजूनही धक्क्यात आहोत. अशा गोष्टीचा अनुभव यापूर्वी कधीच आला नव्हता. बोटीत जास्त लोक असते, तर कदाचित ती उलटली नसती असंही त्यांनी नमूद केले. कारवाईची मागणी अर्पिता गांगुली यांनी संबंधित बोट ऑपरेटरांवर कारवाईची मागणी केली असून, अशा वॉटर स्पोर्ट्सवर बंदी घालण्याची गरज व्यक्त केली आहे.

## चाकणकर गँगकडून धमक्या

पुणे : प्रतिनिधी हगवणे प्रकरणात राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्या राजीनाम्याची मागणी विरोधकांकडून होत असताना चाकणकर समर्थक आक्रमक झाले असून धमक्या देत आहेत, तसेच फोटो मॉर्फ करून बदनामी करत असल्याचा आरोप शिवसेना (ठाकरे गट) नेत्या सुषमा अंधारे यांनी केला आहे. या अनुषंगाने सुषमा अंधारे यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना एक खुले पत्र लिहित तक्रार केली आहे.



दरम्यान, पुण्यातील वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणामुळे राज्यात खळबळ उडाली असतानाच, आता या प्रकरणात राज्य महिला आयोग आणि त्याच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्यावर सडकून टीका केली जात आहे. या प्रकरणात राज्य महिला आयोगाने हलगर्जीपणा केल्यामुळे, विरोधी पक्षाकडून रूपाली चाकणकर यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे. या प्रकरणातील राजकीय रंग आणखी गडद झाला आहे.

पत्रामध्ये सुषमा अंधारे यांनी अजित पवार यांना थेट प्रश्न विचारले आहेत. महिलांच्या सन्मानासाठी आणि संरक्षणासाठी महिला आयोगाच्या अध्यक्षपदावर ज्यांना बसवले आहे, त्याच बाई जर हगवणे प्रकरणात प्रश्न विचारला म्हणून त्यांच्या या ब्लॅकमेलर गँगमार्फत इतक्या गलिच्छ पद्धतीने आमच्यावर टिप्पणी करत असतील, तर आम्ही न्याय आता कुणाकडे मागायचा? असा सवाल अंधारे यांनी पत्रातून विचारला आहे.

सुषमा अंधारे यांनी पत्रात पुढे म्हटले आहे की, रूपाली चाकणकर यांच्या समर्थक गँगकडून अनेक महिलांना धमक्यांचे आणि अश्लील शिवीगाळीचे फोन सुरू झाले आहेत. त्यातल्या काही कॉल रेकॉर्डिंग सकाळी रोहिणीताई खडसे यांनी वाजवून दाखवल्या. आता रूपाली चाकणकरांची गँग अशा गलिच्छ पद्धतीने फोटो मॉर्फ करून, आपण (सुषमा अंधारे), रोहिणी खडसे, यशोमती ठाकूर, वर्षा गायकवाड यांना अत्यंत वाईट भाषेमध्ये टिप्पणी करत आहेत, असेही अंधारे यांनी नमूद केले आहे.

# माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीयमंत्री विलासराव देशमुख यांना बाभळगावच्या विलासबागेत जनसमुदायाने केले ८० व्या जयंतीनिमित्त भावपूर्ण अभिवादन

लातूर / प्रतिनिधी : - राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि माजी केंद्रीय मंत्री, लोकनेते विलासराव देशमुख यांची सोमवार, दि. २६ मे रोजी ८० वी जयंती साजरी करण्यात आली. सामाजिक क्षेत्रात कार्य करू पाहणाऱ्या सर्वांचे प्रेरणास्त्रोत असलेल्या आदरणीय विलासराव देशमुख साहेब यांच्या जयंतीनिमित्त बाभळगाव येथील विलासबागेत असलेल्या स्मृतीस्थळी कुटुंबीय आणि हजारो स्नेही मंडळींच्या उपस्थितीत त्यांना भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. सोमवार दि. २६ मे रोजी सकाळी ९ वाजता विलासबाग, बाभळगाव येथे 'भावस्वरांजली' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आदरणीय विलासराव देशमुख आणि देशमुख परिवारावर प्रेम करणारे स्नेही, मित्र, हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सर्वांनी स्मृतीस्थळी पुष्पांजली अर्पण करून आपल्या आवडत्या नेत्याला आदरांजली वाहिली. प्रारंभी, राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री, लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा आमदार अमित विलासराव देशमुख, विलास साखर कारखाना चेअरमन वैशालीताई देशमुख, सुप्रसिद्ध सिने अभिनेते रितेश देशमुख, लातूर ग्रामीणचे माजी आमदार धीरज विलासराव देशमुख, सौ. जेनिलीया देशमुख, सौ. दीपशिखा देशमुख, अभिजीत देशमुख आणि डॉ. सारिका देशमुख, चि.वंश, कु.दिवीयाना, चि.रीयान, चि.राहील यांनी आदरणीय विलासराव देशमुख यांना पुष्पांजली अर्पण केली. सुप्रसिद्ध शास्त्रीय गायक आनंद भाटे यांच्या भावस्वरांजलीने आदरांजली सभेला मंगलमय स्वरूप प्राप्त झाले. आनंद भाटे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी 'तीर्थ विठ्ठल', 'माझे माहेर पंढरी', 'इंद्रायणी काठी', 'चिन्मया सकल हृदया' या गीतांसह शास्त्रीय संगीताच्या माध्यमातून पुष्पांजली अर्पण केली. यावेळी खासदार डॉ. शिवाजी काळगे, माजी मंत्री आमदार संजय बनसोडे, आमदार विक्रम काळे, माजी मंत्री विनायकराव पाटील, माजी आमदार वैजनाथराव शिंदे, माजी आमदार त्र्यंबक भिसे, ड. व्यंकट बेद्रे, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अतीरीक्त पोलीस अधिक्षक श्री देवरे यांच्यासह लातूर





जिल्हा आणि संपूर्ण महाराष्ट्रातून विविध क्षेत्रातील हजारोंच्या संख्येने आलेल्या स्नेहमंडळींनी लोकनेत्याला पुष्पांजली अर्पण करून आदरांजली वाहिली. यावेळी शेतकरी संघटनेचे रविकांत तुपकर, आबासाहेब पाटील, संजय शेटे, जगदीश बावणे, व्हा.चेअरमन विजय देशमुख, व्ही. पी. पाटील, दिलीप पाटील नागराळकर, ललीतभाई शहा, न्मथअप्पा किडे, श्रीशैल उटगे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस अध्यक्ष ड. किरण जाधव, प्रवीण पाटील, तहसीलदार सौदागर तांदळे, माजी चेअरमन यशवंतराव पाटील, कार्यकारी संचालक पंडित देसाई, कार्यकारी संचालक संजीव देसाई, कार्यकारी संचालक आत्माराम पवार, संतोष बिराजदार, प्रा. स्मिता खानापुरे, ड.दिपक सुळ, जितेंद्र देहाडे, डॉ.लक्ष्मण देशमुख, डॉ. मनोज देशमुख, अशोक काळे, संतोष सोमवंशी, रवीद्र काळे, ड. समद पटेल, अभय साळुंके, दगडूअप्पा मिटकरी, बालाप्रसाद बिदादा, प्रा. शिवराज मोटेगावकर, तुकाराम पाटील, सुनीता आरळीकर, सपना किसवे, कमलताई मिटकरी, स्वाती मोरे, सीमा क्षीरसागर, खाजबानू बुऱ्हाण अन्सारी, व्यंकटेश पुरी, उपसरपंच गोविंद देशमुख, बालाजी रेड्डी, तात्यासाहेब देशमुख, दगडूसाहेब पडिले, रामानुज रांदड, अनुप मलवाड, चाँदपाशा इनामदार, प्रा. डी. एन. केंद्रे, पाडुरंग वीर, मोहन सुरवसे, संतोष देशमुख, कैलास कांबळे, प्रा.सुधाकर मोरे, चक्रधर शेळके, पवनकुमार गायकवाड, अनंतराव देशमुख, लालासाहेब पवार, राम स्वामी, फारुख शेख, जीवन सुरवसे, प्रा.ओम मोतीपवळे, अनिल पाटील, लालासाहेब देशमुख, बाळकृष्ण देशमुख, शिवाजी कांबळे, लक्ष्मण मोरे, राजकुमार जाधव, रविशंकर जाधव, बालाजी मुस्कावाड, लक्ष्मण कांबळे, चंद्रकांत चिकटे, संभाजी सुळ, मारुती पांडे, सुपर्ण जगताप, प्रमोद जाधव, दत्ता सोमवंशी, भैरवनाथ सूर्यवंशी, प्रा.शिवाजी जवळगेकर, डॉ. जमदाडे, जितेंद्र स्वामी, सुनील पडिले, श्याम भोसले, नारायण लोखंडे, उदयसिंह देशमुख, पत्रकार अतुल देऊळगावकर, पत्रकार दिपरत्न निलंगेकर, पत्रकार शशिकांत पाटील, पत्रकार हरी तुगावकर, पत्रकार राम जेवरे, पत्रकार वामन पाठक, पत्रकार संजय सगरे, पत्रकार हरीराम कुलकर्णी, ज्येष्ठ पत्रकार जयप्रकाश दगडे, अरुण समुद्रे, शहाजी पवार, संजय पाटील, धनंजय देशमुख, चंद्रशेखर दंडिमे, सहदेव मस्के, सचिन बंडापल्ले, डॉ. बालाजी साळुंके, बालाजी वाघमारे, गुरुनाथ गवळी, लक्ष्मण मोरे, , जयचंद भिसे, संभाजी रेड्डी, राम चालवाड, ड. गोपाल बुरबुरे, पृथ्वीराज शिरसाठ, सतीश पाटील, अशोक गट्टू अग्रवाल, रमेश सूर्यवंशी, सतीश हलवाई, श्रीकांत सोनवणे, वासुदेव दुर्वे, हमीद बागवान, लालासाहेब चव्हाण, मनोज देशमुख, श्याम बरुरे, पुनीत पाटील, चंद्रकांत धायगुडे, अरविंद भातांबरे, अस्लम शेख, खाजा शेख, प्रताप पाटील, बालाजी पराशर, श्रीराम शिंदे, महेश काळे, प्रा. भालचंद्र येडवे, सुंदर पाटील कव्हेकर, विकास देशमुख, संतोष देशमुख, नरसिंग बुलबुले, नरेश पवार, हणमंत पवार, संगीता मोळवणे, रसूल पटेल, मनोज पाटील, पंडित कदम, मदन भिसे, विजय गायकवाड, मोहन माने, राजा माने, महादेव मुळे, प्रा. राजकुमार जाधव, यशपाल कांबळे, सूर्यकांत कातळे, नागसेन कामेगावकर, गणपतराव बाजूळगे, युवराज जाधव, कल्याण पाटील, आनंद वैरागे, सुरेश गायकवाड, इसरार सगरे, प्रा. प्रवीण कांबळे, गोटू यादव, पप्पू देशमुख, रोहित दयाळ, देविदास बोरूळे पाटील, आकाश भगत, गणेश येवले, विकास वाघमारे, कुणाल वागज, ड. अंगद गायकवाड, ड. सुहास बेद्रे, ड. प्रदीप गंगणे, ज्योती पाटील, अशोक देडे, धनंजय पवार, मारुती चव्हाण, मीनाताई सूर्यवंशी, स्वयंप्रभा पाटील, प्रीती भोसले, प्रा. रामदास पवार, शेख शफी, इम्रान सयद, अयुब पठाण, प्रवीण घोटाळे पाटील, हरिभाऊ गायकवाड, श्रीनिवास शेळके, पत्रकार यशवंत पवार, मनोज चिखले, गोविंद डुरे, सुभाष घोडके, सुधीर गोजमगुंडे, श्रीशैल्य उटगे, कैलास पाटील, दयानंद बिडवे, ज्ञानेश्वर पवार, ज्ञानेश्वर भिसे, पत्रकार एजाज शेख, अमरसिंह भोसले, पत्रकार बशीर शेख, विजय टाकेकर, राजेंद्र मोरे, राजेंद्र कसबे, तबरेज तांबोळी, निजाम शेख, पवन सोलंकर, आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर, विविध पक्ष, संघटना, संस्थांचे पदाधिकारी, काँग्रेस पक्ष व संलग्न संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि हितचिंतक यांनी विलासराव देशमुख यांच्या भावपूर्ण आठवणी जागवल्या. या सभेचे सूत्रसंचालन बाळकृष्ण धायगुडे व सचिन सूर्यवंशी यांनी केले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE